# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उद्यान विभाग

दुसरा मजला, प्रभाग समिती क्र.4, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व), ता.जि.ठाणे-४०१ १०७. दुरध्वनी क्र. २८१०३४०९

जा.क्र. मनपा/उदयान/मिरारोड/ ८७८ /२०२३-२४ — दिनांक : ०३ /०२/२०२४

## // जाहीर नोटिस सुचना //

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन अधिनियमाच्या प्रकरण पाच कलम ८ (३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहिर करण्यात येते की, खालील नमुद तक्त्यातील झाडे काढणे करणेकामी प्रत्यक्ष पाहणी केली असता त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | वृक्षाचे नाव | अंदाजे उंची | संख्या | अदांजे वय | तपशील |
|---|---|---|---|---|---|
| १) सरगम को.ऑ.हौ.सो.लि यांचे १७/०१/२०२४ रोजीचे पत्र. | | | | | |
| १ | नारळ | ३० ते ३५ | ०१ | १० वर्ष | सदरील झाड सरगम को.ऑ.हौ.सो.लि, गौरव गॅलक्सी फेस 1, नीत्यानंद नगर, मिरा रोड (पु.) येथिल असून सोसायटीच्या संरक्षण भिंतीवर पुर्णपणे झुकलेले असून झाडामुळे भिंतीला तडे गेले आहे. सदर झाडामुळे भिंत केव्हाही पडू शकते. या कारणास्तव झाड मुळासहित काढणे आवश्यक आहे. |
| २) केनवुड को.ऑ.हौ.सो.लि यांचे १६/०१/२०२४ रोजीचे पत्र. | | | | | |
| १ | उंबर | ८ ते १० फुट | ०१ | ०५ वर्ष | सदरील झाड केनवुड टॉवर को.ऑ.हौ.सो.लि.S.V.P शाळा जवळ,मिरा भाईदर रोड मिरा रोड (पु.) येथिल असून सोसायटीच्या संरक्षण भिंतीवर उगवलेले आहे. त्या मुळे भिंतीला तडा गेला आहे. सदर झाडामुळे भिंत केव्हाही पडून जिवित व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कारणास्तव झाड मुळासहित काढणे आवश्यक आहे. |

सदर प्रस्तावित वृक्ष तोडण्याची /स्थलातंरीत करण्याची परवानगी देण्याचा इरादा आहे. याबाबत नागरिंकाच्या काही हरकती तसेच सदर वृक्षांवर पक्षांची घरटी असल्यास जाहिर सुचना प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत लेखी स्वरुपात उप-आयुक्त (उद्यान विभाग), मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) येथे किंवा garden@mbmc.gov.in किंवा mbmc.garden@gmail.com या ई-मेल आयडी वर कळविण्यात यावे. तसेच मुदतीनंतर प्राप्त होणा-या हरकती/सुचनांचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

(योगेश गुणिजन)
**सहाय्यक आयुक्त**
**तथा वृक्ष अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

2023-2024 Sadar -Permission